दूरध्वनी क्रमांक : २२०४१८०३/
२२०४२८६६

क्र. निशि/मागणी/२०१५/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र.३७०
नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा
यांचे कार्यालय, एक्सप्रेस इमारत, २ रा मजला,
चर्चगेट, मुंबई-४०० ०२०
दिनांक - १५/०५/२०१५.

प्रति,

१. सर्व उपनियंत्रक शिधावाटप, परिमंडळ कार्यालये
२. सर्व शिधावाटप अधिकारी, शिधावाटप कार्यालये

विषय :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंबातील
लाभार्थ्यांसाठी अन्नधान्याचे मासिक उर्वरीत नियतन
माहे जून, २०१५.

संदर्भ :- १. क्र.असुका-२०१५/प्र.क्र. ३९/नापु. २२ दि. २९ एप्रिल, २०१५.
२. क्र. निशि/मागणी/२०१५/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र. ३३५
दि. ०२.०५.२०१५.

शासनपत्र क्र.असुका २०१५/प्र.क्र. ३९/नापु.२२ दि. २९ एप्रिल, २०१५ अन्वये मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत माहे जून, २०१५ करीता प्राधान्य कुटुंबातील ९०१०७४७ लाभार्थी सदस्य संख्येसाठी १८०२२ मे. टन तांदूळ व २७०३२ मे. टन गहू असे एकूण ४५०५४ मे.टन अन्नधान्याचे नियतन मंजूर करण्यात आले आहे. प्रत्यक्षात माहे मार्च, २०१५ अखेरची प्राधान्य कुटुंब योजनेची लोकसंख्या ही ८८४६७३३ अशी आहे.

सदर नियतनाच्या अनुषंगाने माहे जून, २०१५ करिता राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ च्या प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी अन्नधान्याचे परिमाण प्रति व्यक्ति ५ किलो अन्नधान्य (तांदूळ २ किलो व गहू ३ किलो) असे आहे.

यापूर्वी प्राप्त शासन पत्र क्र.असुका/२०१४/प्रक्र.१०६/ना.पु.२२, दि. १ ऑगस्ट, २०१४ अन्वये प्राप्त सुचनेनुसार प्रत्येक महिन्याची उचल ही त्या पूर्वीच्या महिन्याच्या अखेरच्या तारखेपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश प्राप्त झालेआहेत. प्रत्यक्षात शासनाकडून नियतन हे दिनांक २९ एप्रिल, २०१५ रोजी प्राप्त झाल्याने व १००% धान्याची उचल विहीत कालावधीत म्हणजेच दिनांक ३१ मे, २०१५ पर्यंत पूर्ण होण्याचे दृष्टीने, माहे मे, २०१५ च्या सुरवातीपासून माहे जून, २०१५ चे कोटयाची उचल सुरु व्हावी म्हणून दिनांक ०२.०५.२०१५ रोजी अधिकृत शिधावाटप दुकानांची १०० % गरज विचारात घेऊन त्या गरजेच्या ५०% अधिकृत शिधावाटप दुकाननिहाय नियतन माहे जून, २०१५ करीता निर्गमित करण्यात आले आहे. शासनाचे दि. १ ऑगस्ट, २०१४ च्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे संपूर्ण नियतनाची उचल नियतनाच्या मागील महिन्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत पूर्ण होईल व लाभार्थ्यांना विहित वेळेत धान्य पूरवठा केला जाईल याबाबत दक्षता घेणेबाबत तसेच यापुढे भारतीय अन्न महामंडळाकडून तसेच केंद्र शासनाकडून मुदतवाढ दिली जाणार नसल्याने सदर सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सुचित केले आहे व प्रत्यक्षात सर्व परीमंडळांकडून माहे एप्रिल, २०१५ ची अखेरची शिल्लक प्राप्त होईपर्यंत ३/४ दिवसांचा कालावधी जात असल्याने प्रथमत: ५०% नियतन मंजूर करण्यात आले आहे.

सदर नियतन मंजूर करताना माहे मे, २०१५ चे नियतनात "माहे जून २०१५ करीता शिल्लक ठेवावयाचा साठा" या रकान्यातील ज्या अधिकृत शिधावाटप दुकानातुन शिल्लक ठेवावयाचा साठा दर्शविण्यात आला होता त्या अ.शि.वा दुकानांच्या ५०% आवश्यकते मधून फक्त तांदळाचा साठा वजा करण्यात आला आहे अनवधनाने गव्हाचा साठा वजा करण्यात आलेला नाही तो उर्वरीत नियतनामधून वजा करण्यात येत आहे. तसेच ज्या दुकानात ५०% किंवा ५०% आवश्यकतेपेक्षा जास्त साठा शिल्लक होता त्या अ.शि.वा. दुकानांना प्रथम चरणात ५०% किंवा ५०% पेक्षा जास्त साठा दुकानात उपलब्ध असल्याने नियतन मंजूर करता येत नाही. सबब अशा दुकानांच्या मंजूर नियतनाचे रकान्यात ०.०० अशी आकडेवारी दर्शविण्यात आली आहे व ५०% आवश्यकते पेक्षा जास्त ठरलेला साठा हा शेवटच्या रकान्यात "उर्वरीत नियतनातून वजा करावयाचा साठा " या शिर्षका खाली दर्शविण्यात आला आहे. त्याची परिमंडळ निहाय आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

## उर्वरीत नियतनातून वजा करण्यात आलेला साठा

| अ.क्र. | परिमंडळ | एकूण प्राधान्य कुटूंब | | उर्वरीत नियतनामधून वजा करावयाचा साठा (मे. टन) | |
|---|---|---|---|---|---|
| | | शिधापत्रिका | लोकसंख्या | तांदूळ | गहू |
| १ | अ | २२३६१६ | ९८१०२६ | ०.३५७ | ०.००० |
| २ | इ | २४७४५४ | ११०२२०३ | ०.२१५ | ०.००० |
| ३ | ई | ५३६९५१ | २५११७०५ | ०.००० | ०.००० |
| ४ | ग | २६११८२ | ११९७१३७ | ०.००० | ०.००० |
| ५ | फ | ६८८०८५ | ३०५४७६२ | ०.००० | ०.००० |
| एकूण | | १९६५३६८ | ८८४६७३३ | ०.५७२ | ०.००० |

सदर नियतन या कार्यालयाचे दिनांक ०२.०५.२०१५ अन्वये मंजूर करण्यात आले असून ५०% मंजूर करण्यात आलेल्या नियतनाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

## प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी माहे जून, २०१५ करीता परिमंडळनिहाय ५०% नियतन

(आकडे मे.टन मध्ये)

| अ. क | परि मंडळ | एकूण | | माहे जून, २०१५ करीता शिल्लक ठेवलेला साठा वजा जाता मंजूर नियतन (एकूण आवश्यकतेच्या ५०% ) | |
|---|---|---|---|---|---|
| | | शिधापत्रिका | लोकसंख्या | तांदूळ (प्रति व्यक्ति २ किलो) | गहू (प्रति व्यक्ति ३ किलो) |
| १ | अ | २२३६१६ | ९८१०२६ | ९७८.५८१ | १४७१.६९२ |
| २ | इ | २४७४५४ | ११०२१०३ | १०९९.३९५ | १६५३.२८० |
| ३ | ई | ५३६९५१ | २५११७०५ | २५११.७०५ | ३७६७.८१२ |
| ४ | ग | २६११८२ | ११९७१३७ | ११९७.१३७ | १७९५.८६७ |
| ५ | फ | ६८८०८५ | ३०५४७६२ | ३०५४.७६२ | ४५८२.४८८ |
| एकूण | | १९६५३६८ | ८८४६७३३ | ८८४१.५८० | १३२७१.१३९ |

तसेच अधिकृत शिधावाटप दुकानातील शिल्लक साठा विचारात घेऊन अधिकृत शिधावाटप दुकानांना मंजूर करावयाची आकडेवारी ही पुढे नमूद केल्याप्रमाणे आहे. सदर आकडेवारीत अधिकृत शिधावाटप दुकानांच्या एकूण आवश्यकतेच्या उर्वरीत ५०% आवश्यकतेमधून शिल्लक साठा वजा जाता अधिकृत शिधावाटप दुकानांना प्रत्यक्षात मंजूर केलेल्या नियतनाच्या आकडेवारीची बेरीज नमूद करण्यात आली आहे.

परंतू प्रत्यक्षात काही अधिकृत शिधावाटप दुकानातून शिल्लक असलेला धान्य साठा हा त्यांच्या माहे जून, २०१५च्या उर्वरीत ५०% आवश्यकतेपेक्षा जास्त असून त्याची अधिकृत शिधावाटप दुकाननिहाय माहिती मंजूर नियतनाचे तक्त्यात सोबत जोडण्यात येत आहे. अधिकृत शिधावाटप दुकानांकडे शिल्लक साठ्यापैकी उर्वरित नियतनापोटी ५०% साठा वापरुन त्यापेक्षा जास्त असलेला साठा हा माहे जुलै, २०१५ चे नियतन म्हणून शिल्लक ठेवावयाचा आहे व त्याचे समायोजन माहे जुलै, २०१५ करीता प्रस्तावित करण्यात येत आहे. त्याची परिमंडळ निहाय माहीती पुढीलप्रमाणे आहे.

परीमंडळ निहाय १००% पेक्षा जास्त असलेला एकूण शिल्लक साठा

| अ.क्र. | परि मंडळ | एकूण प्राधान्य कुटूंब | | परीमंडळ निहाय १००% पेक्षा जास्त असलेला एकूण शिल्लक साठा (आकडे मे.टन मध्ये) | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | | | |
| | | शिधापत्रिका | लोकसंख्या | तांदूळ | गहू |
| १ | अ | २२३६९६ | ९८१०२६ | ८.८०९ | ११.३७३ |
| २ | ड | २४७४५४ | ११०२१०३ | ०.२१७ | ०.५४१ |
| ३ | ई | १३६९५१ | २५११७०५ | १.८४१ | २.३३८ |
| ४ | ग | २६९१८२ | ११९७१३७ | ११.४३० | १३.५६० |
| ५ | फ | ६८८०८५ | ३०५४७६२ | २.४७३ | २.८५३ |
| एकूण | | १५६५३६८ | ८८४६७३३ | २४.७७० | ३०.६६५ |

सर्व अधिकृत शिधावाटप दुकानांना ५०% नियतन दिनांक ०२.०५.२०१५ चे पत्रान्वये मंजूर करण्यात आले असून सदर मंजूर नियतन व दुकानातील एप्रिल, २०१५ अखेरच्या प्रत्यक्ष शिल्लक साठा (शिल्लक असल्यास) व उर्वरीत नियतनातून वजा करावयाचा साठा मिळून १००% गरज पूर्ण होत असल्याने सदर दुकानांना १००%पेक्षा जास्त नियतन देता येत नाही. अशा दुकानदारांनी शिल्लक साठ्यातून उर्वरीत ५०% नियतनाचे वाटप शिधापत्रिकाधारकांना करावे व १०० % आवश्यकतेपेक्षा जास्त धान्यसाठा जो नियतनाचे शेवटच्या रकान्यात दर्शविण्यात आला आहे, तो माहे जुलै, २०१५ चा कोटा म्हणून शिल्लक ठेवण्यात यावा, तशा स्वयंस्पष्ट सूचना अधिकृत शिधावाटप दुकानदारांना देण्यात याव्यात.

उपरोल्लेखित शिल्लक साठा हा यापूर्वीच अधिकृत शिधावाटप दुकानात उपलब्ध असून प्रत्यक्षात त्या दुकानांची १००% आवश्यकता पूर्ण झाल्याने त्या दुकानांचे समोर मंजूर नियतनात ०.०० (निरंक) अशी आकडेवारी दर्शविण्यात आली आहे. सदर नियतन हे व्यक्तीनिहाय व दुकाननिहाय मंजुर करण्यात येत असल्याने वजा (उदा.-३५,-४५ वगैरे) आकडेवारी दुकाननिहाय नियतनात दर्शविल्यास त्या शिधावाटप कार्यालयाचे एकूण मंजूर नियतन प्रत्यक्ष गरजेपेक्षा कमी होत असून अन्य शिधापत्रिकाधारक वंचित राहू नयेत म्हणून सदर अतिरीक्त साठा हा स्वतंत्र रकान्यात दर्शविण्यात येत आहे. माहे जून, २०१५ करीता ज्या अधिकृत शिधावाटप दुकानांना धान्य साठा मंजूर करण्यात आला आहे त्या दुकानांची परिमंडळनिहाय एकूण मंजूर नियतनाची आकडेवारी ही पुढील प्रमाणे आहे.

**माहे जून, २०१५ करीता एकूण मंजूर नियतन**

(आकडे मे.टन.)

| परि मंडळ | दि०२.०५.२०१५ चे पत्रान्वये ५०% मंजूर नियतन- | | प्रत्यक्ष अ.शि.दुकानातील माहे एप्रिल,२०१५ अखेरचा शिल्लक व उर्वरीत नियतनातून वजा करावयाचा साठा विचारात घेऊन मंजूर करण्यात आलेले उर्वरित नियतन | | माहे जून, २०१५ करीता एकूण मंजूर नियतन. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू |
| अ | ३७८.५८१ | ३४७१.६३२ | ८९२.३८२ | १२९७.५०८ | ३८७१.५६३ | २७६९.२०० |
| इ | ३०११.३३५ | ३६५३.२८० | ३०४२.६८४ | ३५३०.३४५ | २१४२.०७९ | ३१८३.६२५ |
| ई | २५११.७०५ | ३७६७.८१२ | २३७१.४९६ | ३५२९.७२५ | ४८९१.२०१ | ७२९७.५३७ |
| ग | ११९०.१३७ | १६९५.८६७ | ११३६.५१० | १६५८.५१५ | २३२३.६४७ | ३४५४.३८२ |
| फ | ३०५४.७६१ | ४५८२.४८८ | २८९६.८९७ | ४२७७.७८८ | ५९५१.५७९ | ८८६०.२७६ |
| एकूण | ८८४१.५८० | १३२७१.१३९ | ८३२८.४८९ | १२२९३.८८१ | १७१७०.०६९ | २५५६५.०२० |

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत शिधापत्रिकाधारकांना विहीत वेळेत अन्नधान्य पोहोचण्याच्या व उचल पूर्ण होण्याच्या दृष्टिकोनातून माहे जून, २०१५ करीता प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी वितरण आदेश त्वरीत प्राप्त करुन घेण्याच्या सूचना संघटीत संस्थांना द्याव्यात. तथापि १००% वितरण आदेश दिनांक २९.०५.२०१५ पर्यंत प्राप्त करुन घ्यावेत. संलग्न संस्थांनी या योजनेतील अन्नधान्याची उचल कोणत्याही परिस्थितीत दि. ३१.०५.२०१५ पर्यंत १००% पूर्ण करावी.

गोदामातून उचल केलेले अन्नधान्य विहित मुदतीत सर्व संबंधित शिधापत्रिकाधारकांना पोहोचेल याची सर्व परिमंडळ उपनियंत्रक शिधावाटप यांनी खबरदारी घ्यावी व त्यासाठी आवश्यक ती उपाय योजना करुन उक्त परिपत्रकांतील आदेशाची अंमलबजावणी करावी.

अधिकृत शिधावाटप दुकानदारांनी अन्नधान्याची मागणी न नोंदविल्यास अथवा संघटित संस्थांनी मुदतीत १०० % धान्याची उचल न केल्यास त्यांचेविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करण्यात येणाऱ्या शिधाजिन्नसांचा गैरव्यवहार होणार नाही याची दक्षता उप नियंत्रक शिधावाटप व शिधावाटप कार्यालयातील अधिकारी /कर्मचारी यांनी घ्यावी. त्यासाठी अधिकृत शिधावाटप दुकानांच्या मानकाप्रमाणे व रोस्टरनुसार नियमित व अचानक तपासण्या कराव्यात. तसेच या कार्यालयाचे परिपत्रक दि. २२/०७/२००९, दि. ३०/०७/२००९ तसेच आय. डी. टी. बाबत पत्र दिनांक ०५/०३/२०१० मध्ये दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

या नियतनापैकी उचल व वाटप केलेल्या अन्नधान्याचा साप्ताहीक तसेच पाक्षिक अहवाल न चुकता या कार्यालयास तसेच उपसंचालक, नागरी पुरवठा (गो/वा) यांना पाठवावा.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा
मुंबई.

प्रत माहितीस्तव अग्रेषित :-

१. मा. राज्यमंत्री, अनापु व ग्रासंवि आणि सार्वांवि, मंत्रालय, मुंबई.
२. मा.खासदार, सर्व मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र, ( संबंधीत परिमंडळामार्फत )
३. मा.आमदार, सर्व मुंबई /ठाणे शिधावाटप क्षेत्र, ( संबंधीत परिमंडळामार्फत )
४. मा.महापौर, मुंबई, नवी मुंबई,ठाणे,कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, मिरा-भाईंदर महानगरपालिका(संबंधीत परिमंडळामार्फत)
५. मा.आयुक्त, महानगरपालिका, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी. मिरा-भाईंदर महानगरपालिका (संबंधीतपरिमंडळामार्फत)
६. मा.नगराध्यक्ष, अंबरनाथ, बदलापूर. ( संबंधीत परिमंडळामार्फत )
७. उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, ३२ सर दि.बा.मार्ग, मुंबई
९. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.२२ व २८ अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
१०. पर्यवेक्षक अधिकारी, श्रम मंत्रालय,७१ बी श्रम साफल्य, एन.जी.आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई ७१.
११. रेशनिंग कृती समिती, ..आर.एल.४,सी - ४,लेन- ८, सेक्टर ९ सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई १४.
१२. श्री. रेडकर संघटक, घरकाम मोलकरीण संघटना, भुपेश गुप्ता भवन, ८५-सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई.
१३. घरकाम मोलकरीण संघटना, मुंबई जिल्हा अंधेरी, घनःश्याम पाटील चाळ,एस.व्ही.रोड,अंधेरी (प), मुं-५८
१४. विशेष कार्यकारी अधिकारी, कामगार आयुक्तांचे कार्यालय, कामगार भवन, सी-२०, ई ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.), मुंबई-५१.
१५. संदीप सुमन,रेशनिंग व शिधिका हक्क संघटना, नवीन बीडीडी चाळ नं. १५/५६, महात्मा ज्योतिबा फूले मार्ग, नायगांव, मुं. १४.

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित :-

१. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य सह.पणन महासंघ मर्या.,कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई.
२. मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचलनालय, मुंबई.
३. उप संचालक, नागरी पुरवठा (गो/वा) परेल, मुंबई.
४. उप संचालक नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, शासकीय कुटीर क्र.५, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुं-२१
५. सहाय्यक नियंत्रक शिधावाटप, (दक्षता शाखा).
६. सर्व संघटित संस्था, परिमंडळ कार्यालयामार्फत.
७. कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, प्रशासन शाखा व नियंत्रण कक्ष, प्रधान कार्यालय.